दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९३ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२८ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

Scan QR code to visit ... Epaper Portal

## पुण्यावरुन महायुतीमध्ये संघर्ष पेटला

# अजितदादांविरोधातील धुसफूस चव्हाट्यावर

## डिपीडीसीतील कामे रद्द करण्याची भाजपची मागणी



**पुणे**–पुण्याच्या जिल्हा नियोजन समितीमध्ये (उझऊ) शिंदे गट आणि भाजपच्या सदस्यांनी अजित पवार गटाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. तर अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाल्यानंतर भाजप आणि शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सुचवलेल्या कामांच्या याद्यांना मोठ्या प्रमाणावर कात्री लावण्यात आली आहे, तसेच अजित पवार त्यांच्या गटातील लोकांना झुकते माप देत असल्याचा भाजपच्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांचा आरोप आहे. त्यामुळे आगामी काळात मोठे राजकीय ‘महाभारत’ घडण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान भाजप आणि शिंदे गटाला नाममात्र निधी देण्यात आल्याचा आरोप भाजप-शिंदे गटाने केला आहे. या गोष्टीच्या निषेधार्थ भाजपचे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील आणि जीवन आप्पा कोंडे यांच्या नेतृत्वात पुणे जिल्हा अधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त, जिल्हा नियोजन अधिकारी आणि जिल्हा परिषद उज यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे कोणतेही इतिवृत्त नसताना ८०० कोटींची कामे मंजूर करण्यात आली आहेत. ती कामे रद्द करा, असे निवेदन भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांना दिले आहे. त्यांनी आरोप केला आहे की, अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाल्यानंतर भाजप आणि शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सुचवलेल्या कामांच्या याद्यांना मोठ्या प्रमाणावर कात्री लावण्यात आली आहे. तसेच अजित पवार त्यांच्या गटातील लोकांना झुकते माप देत असल्याचा भाजपच्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांचा आरोप आहे.अजित पवारांच्या कार्यकाळात मंजूर झालेली ८०० कोटींची कामे रद्द करा, अन्यथा न्यायालयात जाणार, असा थेट इशारा दिला आहे.यामुळे जिल्हा नियोजन समितीत भाजप, एकनाथ शिंदे गट विरुद्ध अजित पवार गट अशा नव्या वादाला सुरुवात झाली आहे.अजित पवार गट सत्तेत सहभागी झाल्याने भाजप-शिंदे गटाच्या कामांना कात्री लागल्याने, महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये धुसफूस सुरू झाल्याचे चित्र आहे.

## डांबरीकरणाच्या ढिगाऱ्यामुळे दुचाकीचा अपघात एकाचा मृत्यू

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिरापूर येथील रस्त्याच्या बाजूला असलेल्या डांबरीकरणाच्या ढिगार्यावर दुचाकी गेल्याने अपघात झाला यात एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी पाच वाजताच्या सुमारास घडली. चिमूर ते कान्पा हा राज्य महामार्ग असून सुद्धा या महामार्गाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष होत असल्यामुळे महिन्याकाठी तीन ते चार अपघात होऊन नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. या रस्त्याबाबत अनेक निवेदन देण्यात आली. रास्ता रोको आंदोलन करण्यात आले तरीही येथील लोक प्रतिनिधींना घेणे देणे नसल्याचा प्रकार दिसून येत आहे. शेवटी लोकप्रतिनिधी या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देतील काय यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.शंकरपूर परिसरातील हिरापूर गाव मधील रमेश वाकडे (६०) मृतकाचे नाव असून संजय नौकरकर (५०)असं गंभीर व्यक्तीचे नाव आहे . हे दोघे हिरापुर येथील रहिवासी आहे संजय नौकरकर हे स्वतःच्या दुचाकी वाहनाने आपले काम करून शंकरपूर वरून हिरापूर येथे जात असताना. हिरापुर येथील ओमकार बार जवळ वळण रस्ता आहे. त्या वळण रस्त्याच्या बाजूलाच डांबरीकरण चा कडक ढिगारा ठेवण्यात आलेला आहे. ती दुचाकी वळण रस्त्यावरून जात असताना त्या ढिगार्यावर गेली. त्यामुळे दुचाकी उंच उडाल्याने हे दोघेही खाली पडले त्यात रमेश वाकडे यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांच्या जागी घटनास्थळीच मृत्यू झालेला आहे तर संजय नौकरकर हे गंभीर रित्या जखमी झालेले आहे .हिरापूर येथील काही गावकरी धावत येऊन त्यांना शंकरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले. त्यात वाकडे यांना मृत घोषित केले तर संजय नौकरकर यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना ब्रह्मपुरी येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आलेले आहे. शंकरपूर पोलीस चौकी चे शिपाई परमेश्वर नागरगोजे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून गुन्हा दाखल केलेला आहे तर वाकडे यांना शविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय चिमूर येथे पाठविण्यात येणार आहे अधिक तपास शंकरपूर पोलीस चौकीच्या कर्मचारी करीत आहे . दिवसेंदिवस या रस्त्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून जागोजागी खड्डे पडलेले आहे. सोबतच हे खड्डे बुजवण्यासाठी डांबर गिट्टी ,चुरी ठेवलेली आहे. बऱ्याच दिवसापासून हे डांबर व चूरी एकत्र झाल्यामुळे तो ढिगारा मजबूत झाल्याने तिथे हा अपघात झालेला आहे .दुचाकी चालकांना हा ढिगारा दिसत नाही त्यामुळे या ढिगार्यामुळे आजपर्यंत छोटे-मोठे अपघात झालेले आहे परंतु आजही या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे एकाला जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे याला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

## माता महाकालीची मुर्ती देत आमदार किशोर जोरगेवार यांनी केले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे चंद्रपूरात स्वागत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज चंद्रपूर दौ-यावर असतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी वन अकादमी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे माता महाकालीची मुर्ती देत चंद्रपूरात स्वागत केले यावेळी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचीही उपस्थिती होती.



यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समीतीचे सचिव अजय जयस्वाल, विश्वस्त माजी नगर सेवक बलराम डोडाणी, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक विश्वजित शहा, तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर प्रसिध्दी प्रमुख नकुल वासमवार आदींची उपस्थिती होती.आज सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे चंद्रपूरात आगमन झाले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मोरवा विमानतळ येथे पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत केले. नंतर वन अकादमी येथे माता महाकाली महोत्सव समीती आणि यंग चांदा ब्रिगेडच्या वतीनेही आमदार किशोर जोरगेवार यांनी माता महाकालीची मुर्ती देत स्वागत केले.

## भाजपा पुलगावची कार्यकारिणी घोषित

**पुलगाव । प्रतिनिधी**

सुशासन दिनाचे औचित्य साधून भाजपा शहराध्यक्ष नितीन बडगे यांनी पुलगाव शहर भारतीय जनता पार्टीची कार्यकारणी घोषित केली.

यावेळी पुलगाव देवळी विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश बकाने, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिव शकील खान, भाजपा जिल्हा महामंत्री राहुल चोपडा, पुलगाव देवळी विधानसभा प्रमुख दीपक फुलकरी, ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.




यावेळी जाहीर करण्यात आलेली कार्यकारिणी अध्यक्ष -नितीन बडगे,महासचिव -आकाश दुबे, राजकुमार पनपालिया,सुधीर बांगरे, मनोज वालदे,शिल्पा ठाकूर ,उपाध्यक्ष - आशिष गांधी, मधुकरराव रेवतकर, विशाल धोपाडे, गजेंद्र गालपेल्लीवार, ॲड अजय तिवारी, मानसिंग झाँझोटे, अभिनव अवस्थी सचिव - राहुल काळे, चंद्रकांत शहाकार, नंदकिशोर बोराटणे, निलेश खापर्डे, अमिन ओलिया, प्रविण पनिया,प्रफुल रावेकर, ब्रजेश पंपालिया, योगिता नंदनवार,कोषाध्यक्ष -मयुर निनावे,प्रसिद्धी प्रमुख - अलि असगर बोहरा

## श्रद्धेय बाबा आमटे यांच्या ११२ वी जयंती निमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदवन येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे कर्मयोगी श्रद्धेय बाबा आमटे यांच्या ११२ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात श्रद्धेय बाबा आमटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व्यवस्थापक समिती चे अध्यक्ष प्रेमदास हेमणे, आनंद निकेतन महविद्यालयाचे प्रयोगशाळा परिचर, गोंडवाना विद्यापीठचा महविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार प्राप्त प्रमोद नागापुरे यांनी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.यावेळी मुख्याध्यापिका प्रणिता नौकरकर, शालेय मुख्यमंत्री शर्वरी नक्षिणे, शालेय उपमुख्यमंत्री सोनल गुळगंडे, व्यासपीठावर उपस्थित होते.




यावेळी प्रमोद नागापुरे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना त्यांनी आपल्या मनोगतात मला कोणीतरी मदत केली म्हणून मी कुणाला काही मदत केली पाहिजे ही भावना मनात ठेवून सामाजिक कार्य केले तर समाजाचा सर्वांगीण विकास झाला शिवाय राहणार नाही असे प्रतिपादन व्यक्त केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रणिता नौकरकार यांनी विद्यार्थ्यांना प्रमोद नागापुरे यांचा सामाजिक कार्याचा परिचय व्यक्त केला. व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचा समारोप विध्यार्थ्यांना चॉंक्लेट वाटपात करण्यात आले. सूत्रसंचालन श्री पत्रुजी उमाटे तर आभार प्रदर्शन सौ. प्रणिता नौकरकार यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक संदेश चिकटे, शिक्षक मेश्राम, शिक्षीका अर्चना महाळकर विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## वेकोलि वसाहतीच्या सुभाषनगर येथे रस्त्याचे डांबरीकरण सुरु

### माजी सरपंच संतोष नुने यांच्या मागणीला यश



**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील वेकोलि वसाहतीच्या सुभाषनगर आणि गांधीनगरच्या रस्त्याचे डांबरीकरण रविवार, २४ डिसेंबर पासून वेकोलितर्फे सुरु करण्यात आले आहे.वेकोलि वसाहतीच्या सुभाषनगर आणि गांधीनगरच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांना घुग्घुसचे माजी सरपंच संतोष नुने यांनी दिले होते. त्याअनुषंगाने भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी वेकोलिकडे पाठपुरावा केला होता.त्यामुळे वेकोलितर्फे सुभाषनगर आणि गांधीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण्यात येत असल्याने घुग्घुसचे माजी सरपंच संतोष नुने यांच्या मागणीला यश आले आहे.रविवारला भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे आणि घुग्घुसचे माजी सरपंच संतोष नुने यांनी कामाची पाहणी केली.

## मोदी सरकारच्या समाजातील योजना अंतिम व्यक्तीपर्यंत पोहोचवा: उपेंद्र कोठेकर

**वरोरा । प्रतिनिधी**

देशवासीयांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी गेल्या ७० वर्षात जे काम झाले नाही. ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी मोदी सरकारने अवघ्या नऊ वर्षात अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. जनतेच्या अपेक्षा व त्यांच्या समस्यांची उकल करणे यासाठी या योजना तळागळातील व्यक्तीपर्यंत पोहोचल्या पाहिजे. त्या पोहोचवण्याचे दायित्व कार्यकर्त्यांवर आहे. समाजाच्या अपेक्षांची पुर्तता या कार्यालयातून झाल्यास या कार्यालयाचे फलित झाले असे होईल असे उद्गार भाजपचे प्रदेश संघटनमंत्री उपेंद्र कोठेकर यांनी वरोरा येथे काढले.ते येथील अस्थिरोग तज्ञ डॉ. सागर वझे यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करताना बोलत होते.यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री व मागासवर्गीय आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराजजी अहिर, राज्याच्या माजी मंत्री शोभाताई फडणवीस, वरोरा विधानसभा क्षेत्र प्रमुख रमेश राजूरकर, भाजपचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपा अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अहेतेशाम अली, भाजयुमोचे प्रदेश सचिव करण देवतळे, नरेंद्र जीवतोडे, सुवर्णरेखा पाटील, ओम मांडवकर डॉ.भगवान गायकवाड, सुरेश महाजन इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भाजपच्या कार्यपद्धतीत कार्यालयाला एक आगळे वेगळे महत्त्व असल्याचे सांगत उपेंद्र कोठेकर म्हणाले, या कार्यालयातून जनतेच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य होणे आवश्यक आहे.भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर भारत माता, दीनदयाल उपाध्याय,शामाप्रसाद मुखर्जी, माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. डॉ. सागर वझे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उपेंद्र कोठेकर यांनी फित कापून केले.या कार्यक्रमात अनेक महिला व पुरुषांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्या सर्वांचे मान्यवरांच्या हस्ते पक्षाचा दुपट्टा टाकून त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले.यावेळी जुन्या पिढीतील कट्टर कार्यकर्ता जगदीश तोटावार यांचा शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. डॉ.सागर वझे यांनी प्रास्ताविक तर वामन तुर्के यांनी कार्यक्रमाचे संचलन केले.महेश श्रीरंग यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### सध्या विचारांची लढाई सुरू :अहिर

डॉ.सागर वझे यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे कार्यालय सर्वच दृष्टीने सुंदर आहे. सुंदर असलेल्या या कार्यालयात जिवंतपणा पक्षाच्या कार्यातून निश्चितच येईल मत व्यक्त करत हंसराज अहिर म्हणाले, लोकशाही प्रधान आपल्या देशात विचार चालले पाहिजे. जात-पात नाही. सध्या विचारांची लढाई सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारामुळे जातीचे समीकरण संपले आहे. पंतप्रधान मोदींचे हे विचार अंतिम व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे आणि हे पोहचविण्याचे हे कार्य या कार्यालयातून होईल यात शंका नाही.

### कार्यालय कार्यकर्त्यांचे हक्काचे घर:शोभाताई

कार्यकर्त्याच्या परिश्रमामुळेच पक्ष मोठा होत असल्याचे सांगत राज्याच्या माजी मंत्री शोभाताई फडणवीस म्हणाल्या , कार्यालय हे कार्यकर्त्यांचे हक्काचे घर असते. कार्यकर्त्याला समस्या नसतात. तो जनतेच्या समस्या सोडविण्याचे कार्य करत असतो. हे कार्य या कार्यालयातून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्याची संघटनेतील भूमिका विशद केली.

## संपादकीय

# आवश्यक दिलासा



मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विषय गेली दहा वर्षे सरकारी पातळीवर चर्चेत आहे. या समाजाच्या उमेदवारांना सन २०१८मध्ये राज्य सरकारने 'एसईबीसी' प्रवर्गातून आरक्षण देऊ केले होते. एखादा समाज सामाजिक वा शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे आढळल्यास त्याला आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, या घटनेतील कलमाच्या आधारे हा कायदा करण्यात आला.मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विषय ऐरणीवर असतानाच या समाजातील 'सामाजिक व शैक्षणिक मागास' प्रवर्गातील (एसईबीसी) पात्र उमेदवारांना आर्थिक दुर्बल प्रवर्गातून (ईडब्लूएस) आरक्षणाचा लाभ मिळण्याचा मार्ग उच्च न्यायालयाच्या निकालाने मोकळा झाला आहे. त्यामुळे या गटातील सुमारे साडेतीन हजार उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेली तीन वर्षे कायदेशीर लढाईत रखडलेली भरती प्रक्रियाही या निकालामुळे मार्गी लागू शकेल. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विषय गेली दहा वर्षे सरकारी पातळीवर चर्चेत आहे. या समाजाच्या उमेदवारांना सन २०१८मध्ये राज्य सरकारने 'एसईबीसी' प्रवर्गातून आरक्षण देऊ केले होते. एखादा समाज सामाजिक वा शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे आढळल्यास त्याला आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, या घटनेतील कलमाच्या आधारे हा कायदा करण्यात आला. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक, कर सहाय्यक व लिपिक; तसेच वन विभाग आणि अभियांत्रिकी विभागातील भरती प्रक्रियेमध्ये मराठा उमेदवारांनी 'एसईबीसी' प्रवर्गातून अर्ज केले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या आरक्षणाला स्थगिती दिली. त्यामुळे या उमेदवारांना आर्थिक दुर्बल प्रवर्गातून संधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्याला महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणात (मॅट) आव्हान देण्यात आले आणि 'मॅट'ने हा सरकारचा आदेश पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करता येणार नाही, असे सांगितले आणि आदेशही रद्द केला. त्या विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर आदेश देऊन उच्च न्यायालयाने मॅटचा निकाल रद्द केला. मुळात हा घटनाक्रम कायदा रद्द झाल्याने उद्भवला आहे. त्यामध्ये उमेदवारांचा कोणताही दोष नाही. त्यामुळे 'ईडब्लूएस' गटासाठी पात्र उमेदवारांना संधी नाकारणे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत ठरले नसते, असा विचार उच्च न्यायालयाने केलेला दिसतो.या निकालातून मिळालेला दिलासा, हा मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकांतील तांत्रिक पेचात सापडलेल्या उमेदवारांसाठी आहे. एकूणात मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रश्न अद्याप मार्गी लागायचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मराठा समाजाला आरक्षण कोणत्या मार्गाने द्यावे, हा खरा सध्याचा पेच आहे. हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा असून, तो सोडविण्यासाठी एक तर अल्पकालीन राजकीय फायदे बाजूला ठेवून संवेदनशीलतेने हाताळण्याचा विषय आहे. त्याबरोबरच या विषयातून मार्ग काढण्यासाठी रस्त्यावरील लढाई करण्याबरोबरच कायद्याचे सखोल ज्ञानही महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या राज्य सरकारद्वारे पात्र उमेदवारांना कुणबी दाखल्यांद्वारे इतर मागास वर्गातील (ओबीसी) आरक्षण देण्याची कार्यवाही सुरू आहे. मात्र, त्यातील मर्यादा आणि त्यावरून सध्या सुरू असलेला संघर्ष पाहिला, तर हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचा विचार झाला पाहिजे. सर्वपक्षीय बैठकीमध्ये राजकीय पक्षांनी केलेल्या ठरावानुसार इतर कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण, हाच मार्ग धोरणकर्त्यांपुढे सध्या तरी दिसतो. मात्र, स्वतंत्र आरक्षणाच्या मार्गात एकूण आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचा अडसर आहे. तो दूर करण्यासाठी केंद्र सरकार आणि संसदेच्या पातळीवर राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची गरज आहे. तमिळनाडूच्या धर्तीवर घटनादुरूस्ती करून स्वतंत्र आरक्षणाची तरतूद, हा पर्याय दिसतो. मात्र, त्यासाठी मराठा समाजाला असलेली आरक्षणाची निकड कायद्याच्या कसोटीवर टिकेल, अशा पद्धतीने सिद्ध करावी लागेल. या कामी समाजातील विचारवंत, कायदेतज्ज्ञ आणि सरकारमधील धुरिणांनी एकत्र येऊन मंथन केले पाहिजे. देश पातळीवर पाहता मराठा समाजाबरोबरच जाट, गुज्जर, पाटीदार या समाजांच्या आरक्षणाच्या मागण्यांबाबत सर्वंकष विचार करण्याची इच्छाशक्ती केंद्र सरकारला दाखवावी लागेल.या सर्व प्रशासकीय, कायदेशीर मुद्द्यांच्या पलीकडे जाऊन पाहिले, तर आरक्षणाची मागणी ही प्रामुख्याने शेतीवर आलेली संकटे, शिक्षणाचा अभाव आणि बेरोजगारी अशा जटील समस्यांचा एक भाग आहे, हे लक्षात येते. त्यामुळे या समस्यांची जाणीव ठेवून कधी तरी या मूळ प्रश्नांना हात घालावा लागेल. आरक्षणाने शैक्षणिक लाभ, शिष्यवृत्ती, सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांमध्ये नोकऱ्या नक्कीच मिळतील. हे लाभ आवश्यकच आहेत. मात्र, समस्यांचे अक्राळविक्राळ स्वरूप पाहता त्यावर थांबून चालणार नाही. सरकारची नोकऱ्या देण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे शिक्षण, कौशल्य शिक्षण अशा मार्गाने तरुणांच्या क्षमतांचा विकास करून त्यांना रोजगार-स्वयंरोजगारक्षम बनविणे, हे खरे आव्हान आहे. अभिनिवेश बाजूला ठेवून काम झाले, तर विकास आणि सामाजिक न्याय ही दोन्ही परस्पर पूरक उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होईल.

# वर्चस्व सांगणारा विजय




सन १९९५ नंतर प्रथमच मायदेशात एका वर्षात एकापेक्षा जास्त कसोटी खेळताना दोन्हीत बाजी मारली. इंग्लंडला हरवताना भारताने महिला कसोटीमधील सर्वाधिक मोठ्या विजयाची नोंद केली, तर ऑस्ट्रेलियाला प्रथमच पराभूत केले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयामुळे महिला संघाच्या विजयांची संख्या ही गमावलेल्या कसोटीपेंक्षा जास्त झाली आहे.

भारताचा पुरुष क्रिकेट संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी सज्ज होत असतानाच महिला क्रिकेट संघाने विजय मिळवून उत्साही सुरूवात करून दिली. भारतीय महिला क्रिकेटपटूंनी २८ वर्षात प्रथमच ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी विजय प्राप्त केला आहे. महिला संघाने ही कसोटी केवळ जिंकलीच नाही; तर ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्वच बाबतीत वर्चस्व राखले. पुरुषांच्या क्रिकेटच्या छायेतून बाहेर पडत स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या दिशेने भक्कम वाटचाल करीत असलेल्या महिला क्रिकेटसाठी हा विजय मोलाचा आहे. या संघाने सर्वच भारतीयांना अभिमान वाटेल, असाच खेळ केला.अखेरच्या दिवशी अवघ्या २८ धावांत पाच बळी घेताना आपली उंचावलेली ताकद अधोरेखित केली. विजयी चौकार मारल्यानंतर स्मृती मानधनाने जेमिमा रॉड्रिग्जला अलिंगन दिले, त्यावेळी भारतीय संघ ड्रेसिंग रुममधून मैदानात आला, तो जल्लोष करीतच. या जल्लोषात मैदानावरील चाहतेही सहभागी झाले. भारतीय महिला क्रिकेट संघाची कसोटीतील ताकद वाढल्याची जाणीव ऑस्ट्रेलियाला झाली होती.

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यातील भारताचे वर्चस्व त्यांनी पाहिले होते. त्यामुळे सामन्यापूर्वी ॲलिसा हिलीने 'भारतीय संघ महिला कसोटीत, क्रिकेटवर भविष्यात वर्चस्व राखू शकतो,' असा अंदाजही व्यक्त केला होता. हे सरते वर्ष नक्कीच महिला क्रिकेटसाठी मोलाचे ठरले. महिला प्रीमियर लीग, त्यापाठोपाठ आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक आणि आता सलग दोन कसोटीतील विजय.सन १९९५ नंतर प्रथमच मायदेशात एका वर्षात एकापेक्षा जास्त कसोटी खेळताना दोन्हीत बाजी मारली. इंग्लंडला हरवताना भारताने महिला कसोटीमधील सर्वाधिक मोठ्या विजयाची नोंद केली, तर ऑस्ट्रेलियाला प्रथमच पराभूत केले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयामुळे महिला संघाच्या विजयांची संख्या ही गमावलेल्या कसोटीपेंक्षा जास्त झाली आहे. भारतीय महिला संघाने आता ४० पैकी सहा कसोटी गमावल्याच्या तुलनेत सात जिंकल्या आहेत. भारताच्या महिला कसोटी कर्णधारांत केवळ हरमनप्रीतलाच शंभर टक्के यश लाभले आहे. क्रिकेटच्या आर्थिक नाड्या भारताकडे आहेत, त्यामुळे महिला कसोटींना चालना हवी असेल, तर इंग्लंड तसेच ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीत यश मिळवणे आवश्यक होते. भारतीय संघाने नेमके हेच साधले आहे. तूर्तास तरी या मोसमात भारतीय महिला संघाच्या आणखी कसोटी निश्चित नाहीत, पण त्याचा विचार करणे प्रशासनास नक्कीच भाग पडू शकते.

# सुजाण ग्राहक होण्यासाठी...

सन १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली, तेव्हापासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला आणि २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा होतो. काल झालेल्या या ग्राहकदिनाच्या निमित्ताने ...

ग्राहक हा राजा आहे, असे म्हणतानाच त्याला अनेक प्रलोभने दाखवून मालाच्या, वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते. जाळ्यात ओढले जाते. बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी पडतो. एकावर एक मोफत किंवा खरेदीवर कूपन, सोडत, सोने खरेदीवर चांदीचे नाणे, फ्लॅट खरेदीवर टू व्हीलर मिळवा... अशा जाहिराती केल्या जातात. त्यांना ग्राहक भुलतो. त्याची फसवणूक होते. ग्राहक दिन साजरा करण्याचा उद्देश ग्राहकाची फसवणूक होवू नये, सेवा मिळवताना हलगर्जी होऊ नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहिती देणे हा आहे. सन १९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला. अध्यक्ष झाल्यावर जॉन एफ. केनेडी यांनी ग्राहक प्रश्नावर व्यासपीठ तयार केले. जागतिक पातळीवर पाठपुरावा झाला. त्याला 'युनेस्को'कडून मान्यता मिळाली. नंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, 'जागतिक ग्राहक दिन' असतो. आपल्या देशात १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी 'ग्राहक हक्क संरक्षण कायद्या'ला मंजुरी दिली. तेव्हापासून हा २४ डिसेंबरला राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा होतो.

या कायद्याने सहा प्रकारचे हक्क ग्राहकाला मिळाले.

१) सुरक्षेचा हक्क : ग्राहक एखादी वस्तू खरेदी करतो, तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पादकानी घेणे आवश्यक असते. जसे फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशिन, मोटर बाइक, कार, फ्लॅट, कुठल्याही वस्तू.

२) माहितीचा हक्क : विकत घेतलेल्या वस्तूंच्या गुणवत्तेबद्दल माहिती विक्रेत्याने ग्राहकांना देणे बंधनकारक आहे.

३) निवड करण्याचा हक्क : विक्रेता एकाच प्रकारचे उत्पादन वा ब्रँन्डचा आग्रह करू शकत नाही. निवडीचा अधिकार ग्राहकांना आहे.

४) म्हणणे मांडण्याचा हक्क : ग्राहकाची फसवणूक झाल्यास योग्य न्यायासाठी आपले म्हणणे मांडण्याचा हक्क आहे.

५) तक्रार करण्याचा हक्क : फसवणूक झाली तर ग्राहक मंच, राज्य ग्राहक परिषदेत जाण्याचा हक्क असतो.

६) ग्राहक शिक्षणाचा हक्क - ग्राहकांना हक्क आणि कर्तव्ये समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाकडून 'जागो ग्राहक जागो..'सारखे उपक्रम केले जातात.

तक्रार कुठेही करा...

सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक २० जुलै २०१९ रोजी लागू झाले. आता जिल्हा आयोग व राज्य आयोग अशी रचना आहे. जिल्ह्यात एक कोटीपर्यंत, राज्य दहा कोटीपर्यंत व त्यावरील रकमेचे दावे केंद्रीय आयोगाकडे असतील. नवीन कायद्यात ऑनलाइन व टेलिशॉपिंग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास व दंडाची तरतूद आहे. तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती देणारे आणि त्या प्रसारित करणाऱ्यांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे. दोन वर्षे तुरुंगवास व ५० लाख दंडाची तरतूद आहे. ग्राहकांची फसवणूक झाली असेल तर त्याला न्याय हा मिळतोच, पण हक्कासोबत काही कर्तव्ये आहेत. ती माहीत हवीत.

-बाजारपेठेत अनेक उत्पादक असतात. त्यात स्पर्धा असणारच. फसव्या जाहिरातीला ग्राहकाने बळी पडू नये.

-बऱ्याचदा ऑनलाईन खरेदीवर सेल असतात, सणवारालाही डिस्काउंट सेल असतात. अशा वेळी न खपलेला, किंवा सदोष माल असू शकतो. तेव्हा सावध राहणे, हे कर्तव्यच आहे.

-खरेदी करताना बिलाचा आग्रह धरावा. ते न दिल्यास विक्रेत्याची तक्रार करावी. माल सदोष असेल तर बिलाशिवाय तक्रार करता येणार नाही.

-एमआरपीपेक्षा जास्त किंमत देऊ नका. खरेदी करताना ती बघा.

-वस्तूंची मुदत म्हणजे एक्सपायरी डेट संपली असेल तर वस्तू नाकारा. अशा वस्तू हानिकारक असू शकतात.


-पेट्रोल भरताना मीटरवर शून्य आकडा हवा. शुद्धतेची शंका असल्यास पुरवठा निरीक्षक, तहसीलदार यांच्याकडे तक्रार करा.

-सोने खरेदी करताना हॉलमार्ककडे लक्ष द्या.

-ऑनलाईन खाद्यपदार्थ मागवताना योग्य काळजी घ्या. पदार्थ खराब असल्यास तक्रार करा.

जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक आयोग व राज्य पातळीवर राज्य ग्राहक आयोग आहेत. तेथे विनाशुल्क तक्रार करता येते. केंद्रात राष्ट्रीय ग्राहक आयोग आहे. राज्यातील दुर्गम भागात ग्राहक कल्याण सल्लागार समिती आहे. याशिवाय 'जागो ग्राहक जागो' व 'कंझ्युमर क्लब' आहेत. गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत, प्रवासी संघ आहेत. ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे. या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते. शासकीय तसेच अशासकीय सदस्य असतात. आता शासनात ग्राहक संरक्षण विभाग आहे. त्यासाठी स्वतंत्र मंत्री असतात. शहरी, ग्रामीण भागात ग्राहकाला न्याय देण्यासाठी व्यवस्था असली तरी खूप काळ ताटकळावे लागते. अनेक ठिकाणी जिल्हा ग्राहक मंचावर अध्यक्ष नसतात. त्यांच्या नेमणुका लवकर होत नाहीत, तर कधी मंचाचे सदस्य नसतात. नव्वद दिवसांत न्याय मिळण्याचा हेतू साध्य होत नाही. ग्राहकांच्या वाढत्या फसवणुकीला आळा बसावा म्हणून केन्द्र सरकारने 'जागो ग्राहक जागो' अभियान सुरू केले आहे. बँका, सार्वजनिक वितरण, वीज, बांधकाम, अन्न व औषधे, पर्यटन, पोस्ट.. अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी या अभियानाच्या हेल्पलाइनवर (मदत सेवा प्रणाली) ग्राहक करू शकतो.जागतिक ग्राहक दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकीय पातळीवरून आयोजन केले जाते. त्यात औपचारिकता असते. कार्यक्रमाचा प्रसार, प्रचार होत नाही. कार्यक्रमास ग्राहक नसतात. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्त धान्य दुकानदार हेच उपस्थित असतात. मोजक्या लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उरकून घेतला जातो. आत्मीयतेने कार्यक्रम होत नाहीत. वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गॅस एजन्सी, वजनमाप अधिकारी हवेत. ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजावून सांगायला हवा. कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती हवी. सालाबाद कार्यक्रम साजरा करून केवळ वर्तमानपत्रात वृत्त येते. सुधारणा मात्र होत नाहीत. कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत. ग्राहक म्हणून त्यांचा उपयोग करायला हवा. कारण, ग्राहक शक्ती + न्याय शक्ती + दंड शक्ती = शोषणमुक्ती हेच समीकरण आहे. न्याय मिळवण्यासाठी न घाबरता तक्रार करायला हवी. ग्राहकाने त्यास दिलेल्या हक्काचा योग्य वापर करून, आपली कर्तव्ये लक्षात ठेवून बाजारपेठेत जागृत राहून खरेदी करावी. मगच फसवणूक होणार नाही.

# सकारात्मक विचारांचा आनंद



जीवन आनंद म्हणजे नक्की काय? आपण आनंदी आहोत, असे म्हणण्यासाठी कोणती मानके आहेत? साधारणपणे, आर्थिक स्थैर्य, मुलेबाळे, त्यांचे जीवन यशस्वीपणे मार्गस्थ होणे, समाजात मान-सन्मान आणि उत्तम आरोग्य या गोष्टी स्वतःच्या सुखासाठी आवश्यक असतात. त्याही पलीकडे समाजकार्यात रमणे, आसपासच्या अडल्या नडल्यांना मदत करणे, म्हणजेच परोपकारांमध्ये मोठा आनंद दडलेला असतो.समाजात दोन प्रकारची माणसे असतात. एक म्हणजे परोपकारी वृत्तीची आणि दुसरी म्हणजे सतत दुसऱ्यांचा मत्सर करणारी, त्यांना खाली ओढणारी, कुठले तरी खुसपट काढून कायम भांडणे आणि कोर्टकचेरी करणारी! आपण दुसऱ्यांना मदत करतो, त्यांच्या अडीअडचणीत साथ देतो, तेव्हा हे कर्मयोगाच्या भूमिकेतून करणे जरुरीचे आहे. आपण त्यांना मदत केली, म्हणून त्यांनी आपल्या नावाचा डिंडोरा पिटावा, आपल्याला त्याचे श्रेय द्यावे, याची बिलकुल अपेक्षा न करणे. काही जण आपले उपकार विसरून आपल्याशी बोलत नसतील अथवा नजर चुकवीत असतील, तर त्याबद्दल बिलकुल वाईट वाटून न घेणे. मला आठवते, एका कामानिमित्त मुंबईच्या फोर्ट विभागातून मी स्टेशनकडे चाललो असताना एक शाळकरी मुलगा माझ्याकडे आला. 'सर, मी गाडीचा पास घरी विसरलोय आणि घरी जाण्यासाठी बसच्या तिकीटासाठी पासष्ट पैसे हवेत.' त्याला मी पैसे घेऊन टाकले. काही दिवसानंतर मला कळून चुकले, की त्या वेळेला जवळच्या चित्रपटगृहात कमीतकमी तिकिट पासष्ट पैसे होते. म्हणजे त्या मुलाने मला मस्त मामा बनवले होते. मला मात्र वाईट वाटले नाही. मी सद्सदविवेकबुद्धीला जागून त्याला मदत केली होती. त्याने ते पैसे कसे वापरले, तो त्याचा प्रश्न होता. त्या कृतीतून माझा आनंद मी प्राप्त केला होता.पंचक्रोशीतील एका मुलाच्या लग्नकार्यासाठी पैसे कमी पडत होते. त्याच्या आईने पन्नास हजार रुपये आमच्याकडे मागितले. सहा महिन्यात परत करेन या बोलीवर! आम्ही पैसे दिले. तीन वर्षांनी नाईलाजाने आम्हाला ते पैसे परत मागावे लागले. त्यांनी पैसे परत दिले, पण त्या पैशांचे तीन वर्षाचे व्याज बारा हजार झाले होते तो आमचा तोटा होता. पत्नी मला म्हणाली व्याजाचे बोलू का? मी नाही म्हटले. आपण त्यांना जी मदत केली ते आपले कर्तव्य होते. त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव नाही, यामुळे आम्ही स्वतःची मनशांती भंग केली नाही. आम्ही त्या कुटुंबाबरोबर अजूनही मित्रत्वाचे संबंध ठेवून आहोत.आपल्याल्या योगदानाची कदर होत नाही, असे फक्त बाहेरच्याच जगात होते असं नाही. घरात, कुटुंबातही कलह होत असतात. घरात ज्येष्ठ भावाने आपल्या धाकट्या भावंडांचा लहानपणी सांभाळ केलेला असतो. वडिलांच्या बऱ्याच जबाबदाऱ्या अशा मोठ्या भावाच्या वाट्याला येतात. छोट्या भावंडांचा अभ्यास घेणे, त्यांची पुस्तके आणि वह्या विकत आणणे, वेष्टने लावणे, अशी कर्तव्ये त्याच्या हातून आपोआप घडलेली असतात. भावंडे मोठी झाल्यावर काळाच्या ओघात अनेकदा त्यांना याचा विसर पडलेला असतो. अशा वेळी आपण आपले कर्तव्य केले, त्यामुळे भावंडे मार्गी लागली तेच आपले फळ, तेच आपले श्रेय; असा फक्त सकारात्मक विचार करावा. मुलाबाळांच्या संदर्भातही आताच्या जीवनशैलीमुळे वादाचे विषय निर्माण होत आहेत. आई-वडिलांना आनंदी राहायचे असेल, तर 'जनरेशन गॅप'मुळे उद्भवणाऱ्या घटनांशी जुळवून घेणे महत्त्वाचे आहे. आजकाल परधर्मातील किंवा परदेशी व्यक्तीशी विवाह बंधन जोडणे अगदी सहज झाले आहे. येथे जुन्या पिढीच्या विचारांची मरगळ मागे ठेवणे महत्त्वाचे आहे. तरुण पिढीला त्यांची स्पेस द्यायला हवी. उगीचच 'आम्ही पूर्वजन्मी काय पाप केले होते,' असा टाहो फोडून दुःखी होऊ नये. थोडक्यात आपला आनंद स्वतःच मिळवायचा असतो. इतरांच्या कृतीमुळे तो आपल्यापासून हिरावून घेण्याचा अधिकार देऊ नये.

# दिनदर्शिकेचे माध्यमातून शिवसेनेचे कार्य पोहोचणार घरोघरी

## शिवसेनेचे पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे लोकार्पण

**वरोरा । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभेत जनसंपर्क अभियान राबविले जात आहे. यामध्ये पक्षाच्या कामाचा आढावा दिनदर्शिकेच्या माध्यमातून प्रत्येक घरोघरी पोहचविण्यात येणार आहे. या दिनदर्शिकेचे लोकार्पण शिवसेनेचे पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव व खासदार संजय राऊत यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव व जिल्हा संपर्कप्रमुख प्रशांत कदम यांच्या मार्गदर्शनात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभेत शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या धोरणानुसार अनेक समाजउपयोगी कार्य राबविल्यात जात आहे. यामध्ये अपंगांना ३ चाकी सायकल वाटप,विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत,रुग्णांना आरोग्यविषयक मदत,गावागावात आरोग्य शिबीर राबविणे व आंदोलनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच औदयोगिक कंपन्यांच्या प्रदूषणामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्याचे काम जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. पक्षाच्या वतीने केलेल्या या सर्व कामाचा आढावा जनसंपर्क अभियान राबवून दिनदर्शिकेच्या माध्यमातून घरोघरी पोहोचणार आहे. या दिनदर्शकीचे लोकार्पण शिवसेनेचे पूर्व विदर्भ संपर्क नेते तथा आमदार भास्कर जाधव व खासदार संजय राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवासेना मा.जिल्हाप्रमुख मनीष जेठानी,उपजिल्हा प्रमुख अमीत निब्रड,शहर प्रमुख संदीप मेश्राम, शिवदुत बंडू डाखरे, माजी उपजिल्हा प्रमुख वसंता मानकर, नागेंद्र चटपल्लीवार,बाळा क्षीरसागर, युवासेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, युवासेना मा.उपजिल्हा प्रमुख महेश जिवतोडे, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, जितेंद्र गुलानी, अरविंद खोबरे व आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## आंतरराष्ट्रीय प्रवास करून 'मोऱ्या' येत्या १२ जानेवारी रोजी महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत रसिकांच्या भेटीला

### 'सफाई कामगार ते सरपंच', 'मोऱ्या'च्या थक्क करणाऱ्या प्रवासाबद्दल विशेष कुतूहल

**मुंबई** -लंडन येथील 'सोहोवाला कोर्ट हाऊस हॉटेल सिनेमा' या लंडनच्या आयकॉनिक सिनेमा हॉलमध्ये पहिल्यांदा 'प्रीमियर शो' करण्याचा मान मोऱ्या या मराठी चित्रपटाने मिळवून, युरोपमधील प्रेक्षकांची हाऊसफुल्ल पसंती मिळविली आहे. 'कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात' मोऱ्याचा टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. तेव्हा पासूनच या चित्रपटाविषयी कुतूहल वाढू लागले होते. 'एलएचआयएफएफ बार्सिलोना, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, 'खजुराहो आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव', 'झारखंड आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव-२०२२', 'पेनझान्स आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव', 'अयोध्या फिल्म फेस्टिव्हल', 'लेक सिटी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल', 'बॉलिवूड इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल' इत्यादी राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय महोत्सवांत मोऱ्याने 'उत्कृष्ट चित्रपटा'चा बहुमान मिळविला आहे. आता नव्या वर्षात येत्या १२ जानेवारी २०२४ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

कान्ससह विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये आमच्या पहिली निर्मिती असलेल्या 'मोऱ्या' या चित्रपटाने जाणकार रसिक समीक्षकांचे लक्ष वेधले होते. युके मधील प्रीमियर शो पाहून बराच वेळ स्तब्ध होतो. चित्रपटाची कथा, मांडणी, अभिनय व सादरीकरण पाहून त्यांना गहिवरून आले होते. 'मोऱ्या' हे पात्र मनात अस्वस्थता, चलबिचल, काहूर निर्माण करते अशी प्रतिक्रिया तेथील अनेक प्रेक्षकांनी बोलून दाखविली. हाच अनुभव युरोपसह, महाराष्ट्रातील काही खाजगी शोज'च्या वेळी येत असल्याचे अभिनेते लेखक दिग्दर्शक जितेंद्र बर्डे सांगतात.एका सफाई कर्मचाऱ्यांची अत्यंत विलक्षण भावस्पर्शी कथा 'मोऱ्या' या चित्रपटात रेखाटण्यात आली आहे. ती साकारण्यासाठी अभिनेता जितेंद्र बर्डे यांनी खास मेहनत घेतली आहे. त्यांनी केलेला सहज संयमी नैसर्गिक अभिनय रसिकांच्या मनात घर करीत आहे. विषयाच्या जातकुळीनुसार धुळे जिल्ह्यातील




'पिंपळनेर या ठिकाणी चित्रपटाचे चित्रीत करण्यात आहे. मूळ पिंपळनेरच्या जितेंद्र बर्डे यांची ही पहिलीच कलाकृती आहे. चित्रपटाच्या माध्यमातून या परिसराचे सौंदर्य जगभर पोहचविल्याचे समाधान जितेंन्द्रसह सर्वांनाच असून या निर्मितीसाठी निर्माती तृप्ती कुलकर्णी, राजेश अहिवले, सहनिर्माते प्रेरणा धजेकर, पूनम नागपूरकर, मंदार मांडके, राहुल रोकडे, सचिन पाटील यांची खंबीर साथ लाभली आहे.'टॉर्टुगा मोशन पिक्चर्स' निर्मित 'मोऱ्या'मध्ये उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, राहुल रोकडे, सुरज अहिवळे, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर, शिवाजी गायकवाड, दीपक जाधव, विजय चौधरी, अविनाश पोळ, रुपाली गायके आणि जितेंद्र पुंडलिक बर्डे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर आणि शीर्षक भूमिकेत जितेंद्र बर्डे यांनी काम केले आहे. सफाई कामगार ते पिंपळनेरचा सरपंच हा 'मोऱ्या' उर्फ सीताराम जेधेचा थक्क करणारा जीवनप्रवास नेमका आहे तरी कसा? हे जाणून घेण्यासाठी येत्या १२ जानेवारी २०२४ रोजी मोऱ्या महाराष्ट्रातील आपल्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये नक्की भेट द्या.

## दीड लाख शेतकरी रब्बीच्या कर्जाविनाच

**सोलापूर :** राज्यस्तरीय बँकर्स कमिटीने (एसएलबीसी) सोलापूर जिल्ह्यातील एक लाख ६४ हजार ९०७ शेतकऱ्यांना रब्बी हंगामात कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. १ ऑक्टोबरपासून रब्बीचा हंगाम सुरू झाला असून, आतापर्यंत तीन महिन्यांत बँकांनी अवघे २५ टक्केच कर्जवाटप केले आहे. जिल्ह्यातील तब्बल एक लाख ३५ हजार ९९१ शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पीककर्ज मिळाले नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे.जिल्ह्यातील सांगोला, माळशिरस, करमाळा, माढा व बार्शी या पाच तालुक्यांमध्ये यंदा दुष्काळ जाहीर झाला आहे. तर इतर तालुक्यांमधील ४६ महसूल मंडलांमध्येही दुष्काळी स्थिती असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जिल्ह्यातील कोणत्याही शेतकरी कर्जदारांकडून सक्तीने कर्जवसुली करू नये, असे आदेश दिले आहेत. त्यानुसार बँकांनी मागील वर्षीच्या शेती कर्जाचे पुनर्गठन करण्याची कार्यवाही सुरू केली आहे.दुष्काळामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बँकांनी आता नवीन कर्जवाटपात हात आखडता घेतल्याची वस्तुस्थिती आहे. 'एसएलबीसी'ने यंदा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात दोन हजार कोटींचे कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. परंतु, जिल्ह्यातील बँकांनी १५ डिसेंबरपर्यंत अवघे ५१५ कोटी ४४ लाखांचेच कर्जवाटप केल्याची वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे बँकांना सक्त सूचना करतील का? आणि बँका देखील १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करतील का, असे सवाल शेतकरी विचारत आहेत.शेती कर्जासाठी कर्जदार शेतकऱ्याला 'सिबिल'ची अट लागू नाही, असे यापूर्वी राज्य सरकारने देखील स्पष्ट केले आहे. तरीदेखील शेतकऱ्यांना कर्ज देताना बहुतेक बँकांकडून सिबिल पाहिलेच जाते.काही हजारांचे कर्ज थकले असल्यास त्या शेतकऱ्याला ते भरून क्लिअर केल्याशिवाय कर्ज मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. 'सिबिल' निर्बंधामुळे अनेक शेतकरी कर्जापासून वंचित आहेत. मागील काही वर्षांत जिल्ह्यातील बँकांनी रब्बी व खरीप हंगामातील १०० टक्के कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही. आता तर दुष्काळ असल्याने शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज मिळत नाही. त्यामुळे नाइलाजास्तव गरजूंना खासगी सावकारांचा दरवाजा ठोठावा लागू शकतो, अशी जिल्ह्यातील सद्य:स्थिती आहे.

## आजपासून शिर्डीत नो मास्क नो दर्शन

**शिर्डी**–शिर्डीत साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. शिर्डीत आजपासून नो मास्क नो दर्शन पॉलिसी लागू करण्यात येणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या ज्या भाविकांकडे मास्क नसेल त्यांना दर्शनासाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच ज्या भाविकांकडे मास्क नसेल त्यांना प्रवेशद्वाराजवळ मास्क उपलब्ध करून देण्याच्या सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत.साईबाबांचे भक्त संपूर्ण जगभरात असल्याने शिर्डीत दर्शन घेण्यासाठी संपूर्ण जगभरातून भाविक शिर्डीत दाखल होतात. मात्र आता कोरोनाच्या जेएन.१ या नव्या विषाणूने जगाची चिंता वाढवली आहे. राज्यात देखील कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. यामुळे आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारपासून साई मंदिरात दर्शनासाठी येताना मास्क बंधनकारक करण्यात आला आहे. तसेच भाविक आणि ग्रामस्थांना प्रवेशद्वाराजवळच मास्क देण्याची सुविधा उपलब्ध करावी, अशी सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी तुकाराम हुळवळे यांना दिली आहे. या सूचनेची अंमलबजावणी बुधवारपासूनच केली जाणार आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी लोकसभेसाठी कंबर कसली:फेब्रुवारी पासून दररोज ३ सभा घेत करणार महाराष्ट्राचा दौरा

**मुंबई**–आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने विशेष रणनीती आखली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४५ हून अधिक जागा जिंकण्याचा निर्धार भाजपने केला आहे. याच निवडणुकीवर महाराष्ट्रातील विधानसभेचे गणित अवलंबून असणार आहे. यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचाराचा धडाका उडवून देणार आहेत. फडणवीस राज्यभर मॅरेथॉन दौरा करणार असून रोज ३ सभा घेत भाजपला चांगल्या जागा मिळाव्या यासाठी प्रयत्न करणार आहेत.दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचाराच्या मैदानात उतरणार असले तरी अजून त्यांचे दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर झाले नाही. मात्र, ते फेब्रुवारीपासून दररोज ३ सभा घेणार आहेत, अशी माहिती समजत असून लवकरच या दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर होणार अशी माहिती आहे. महायुतीच्या आमदार आणि खासदारांसोबत फडणवीस प्रचार करणार आहेत. केंद्रात नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपने कंबर कसली असून त्याचाचा एक भाग म्हणून उत्तर प्रदेश नंतर मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रावर भाजपने लक्ष केंद्रीत केले आहे.राजकीय विश्लेषक यांच्या मते २०२४ लोकसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील मुख्यमंत्रीपदासंदर्भात निर्णय होऊ शकतो. पण गेली काही दिवस सोशल मिडीयावर भाजपने ३ राज्यांत नव्या चेहऱ्यांना संधी दिल्यामुळे महाराष्ट्रातही त्याची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे, अशी चर्चा सुरू असून असे झाले तर भाजप नेते विनोद तावडेंसारख्या दुसऱ्या फळीतील नेत्यांची लॉटरी लागण्याची चिन्हे आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर फडणवीसांकडून हे दौरे आयोजित करण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. त्यापैकी महायुतीने ४५ पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपने फेब्रुवारीपासून राज्याच प्रचाराचा धडाका लावण्याचं निश्चित केलं आहे. राज्यातील भाजपचा चेहरा असलेले देवेंद्र फडणवीस या निमित्ताने राज्य पिंजून काढणार आहेत.

# उदगीर येथे २९ डिसेंबरपासून तीन दिवस 'राज्यस्तरीय युवा महोत्सवाचे' आयोजन

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**उदगीर**–क्रीडा व युवक सेवा संचलनालय व कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र युवा राज्य महोत्सव दि.२९ ते ३१ डिसेंबर रोजी, तालुका क्रीडा संकुल उदगीर येथे होणार आहे. यामध्ये युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी केंद्र शासनाच्या वतीने १२ ते १६ जानेवारी या कालावधीत 'राष्ट्रीय युवा महोत्सव' आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये राज्याचे प्रातिनिधिक संघ सहभागी करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार यावर्षीचा राज्यस्तरीय युवा महोत्सव घेण्याचा बहुमान उदगीर शहराला मिळाला असुन आपल्या उदगीर शहरात दि. २९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत होणार आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते ३० डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजता उदगीर शहरातील तालुका क्रीडा संकुल (जिल्हा परिषद मैदान), उदगीर येथे या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील, जिल्ह्यातील नामवंत खेळाडु, कलाकार, पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे क्रीडा व



युवक संचालनाचे उपसंचालक युवराज नाईक व जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. केंद्र शासनाच्यावतीने १२ ते १६ जानेवारी, २०२४ या कालावधीत पुणे येथे राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य शासनाने सन २०२३-२४ या वर्षातील राज्यस्तर युवा महोत्सव आयोजनाची संधी लातूर जिल्ह्यास उपलब्ध करुन दिली असून आयोजन समितीच्या वतीने 'राज्यस्तरीय युवा महोत्सव' दि. २९ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत आपल्या उदगीर शहरामध्ये आयोजित करण्यात आल्याने या शहराचे नाव पुन्हा एकदा देशाच्या कानाकोप-यात गाजणार आहे. असे महोत्सव मोठ्या शहरात होत असतात मात्र या भागाचे आमदार व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या प्रयत्नाने उदगीर शहरात पहिल्यादांच 'राज्यस्तरीय युवा महोत्सव' आयोजित करण्यात आला असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी लकडे यांनी सांगितले. या महोत्सवात जवळपास १३ समूह लोकनृत्य, वैयक्तिक सोलो लोकनृत्य, लोकगीत, वैयक्तिक सोलो लोकगीत, कथा लेखन, पोस्टर स्पर्धा, वकृत्व फोटोग्राफी, महाराष्ट्र राज्यासाठी विज्ञानातून तृणधान्य वाढीसाठी विकास व समाज्यासाठी विज्ञान या संकल्पनेवर होणार आहेत. हस्तकला, वस्त्रोद्योग, अग्रो प्रोडक्ट अशा प्रकारामध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे या आठ विभागातून सुमारे ८०० कलाकार सहभागी होतील. महोत्सवातील विविध बाबींच्या परीक्षणासाठी राज्यभरातून तज्ञ कलावंतांना पाचारण करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय लातूरच्या वतीने महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी समिती गठीत केलेली असून समितीच्या वतीने राज्यातील नामवंत निवडक कलाकारांना निमंत्रीत करुन महोत्सवाचे नेटके आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आयोजन समितीने महोत्सवाचा लोगो, थीम साँग. नाविन्यपूर्ण बाबी केलेल्या आहेत. महोत्सवाच्या निमित्ताने उदगीर शहरातील सर्व नागरीकांना २९, ३० व ३१ डिसेंबर या कालावधीत लोककलेची मेजवाणी उपलब्ध होणार असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा व कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेत क्रीडा व युवक संचालनाचे उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, आदी उपस्थित होते.

# अभ्यासासाठी पूरक वातावरण निर्मीतीकरीता चंद्रपूरात खुली अभ्यासिका तयार करणार-आ.किशोर जोरगेवार

## वडगांव येथील अभ्यासिकेच्या इमारतीचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरातील विद्यार्थी प्रतिभाशाली आहे. प्रत्येक क्षेत्रात त्याने भरारी घेतली आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा देण्याचा आमचा मानस आहे. आपण मतदार संघात११अभ्यासिका तयार करत आहोत. यातील आज दुस-या अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण झाले आहे. अभ्यासा बरोबरच त्यांना विचारांची देवाण - घेवाण करता यावी,आपले अनुभव दुस-या विद्यार्थ्यांपर्यत्न पोहचविता यावेत. अभ्यासासाठी पूरक असे उत्तम वातावरण निर्माण व्हावे यासाठी आपण चंद्रपूरात५०लक्ष रुपयातून खुली अभ्यासिका तयार करणार असुन हा चंद्रपूरातील पहिला प्रयोग असणार आहे. असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आमदार निधीतून वडगाव येथील नानाजी नगर येथे अभ्यासिकीचे इमारत बांधकाम करण्यात आले आहे. आज सदर ईमारतीचे आमदार किशोर जोरगेवर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी नगर सेवक पप्पू देशमूख यांची तर प्रमुख अतिथी म्हणून नवदत्त क्रीडा मंडळाचे अध्यक्ष हरिचंद्र येरगुडे,विनोद निखाडे,जनविकास युवा आघाडीचे अक्षय येरगुडे,जनविकास महिला आघाडी प्रमुख मनीषा बोबडे,सार्वजनिक दत्त मंदिराचे सचिव व्यंकटेश उपगन्लावार,बाळू पारखी,मनोज भैसारे आदींची उपस्थिती होती.यावेळी बोलताना ते पूढे म्हणाले की,केलेल्या संकल्पाची पुर्तता होते. तो आनंद मोठा असतो. आमदार होताच चंद्रपूर मतदार संघात गरिब - गरजु विद्यार्थ्यांना निशुल्क अभ्यास करता यावा याकरिता११अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता. तो पूर्ण होउ लागला आहे. आज आपण मतदार संघातील दुस-या अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण करत आहोत. ही दत्त मंदिर येथील लोकार्पीत झालेली अभ्यासिकेची ईमारत शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात नक्कीच योगदान देणारी ठरेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.जोरगेवार म्हणाले कि,चंद्रपूर मतदार संघाचा विकास होत आहे. हा विकास होत असताना समाजातील सर्व घटकांना स्पर्श करण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे. मतदारसंघातील ग्रामीण भागात आपण विकास पोहचवू शकलो आहे. महाविकास आघाडी सरकार आणि आता शिंदे- फडणविस सकरकार या दोनही काळात आपण विविध विभागातून मोठा निधी खेचून आणला आहे. या निधीतून विकासकामे करत असतांना मोठ्या इमारती,बगीचे बांधण्यावर आपण भर न देता लोकउपयोगी वास्तु उभारण्यावर लक्ष केंद्रीत केले. समाजाचे प्रबोधन व्हावे यासाठी आपण सामाजिक भवन उभारले आहे. हे सामाजिक भवन भविष्यात सांस्कृतीक,सामाजिक,धार्मिक कार्यक्रमासाठी उपलब्ध असणार आहे.तर कोरोणा काळात विद्यार्थ्यांवर कोसळलेल्या संकटात आपण विद्यार्थ्यांसाठी मतदार संघात११अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता. यासाठी मोठ्या निधीची गरज होती. ती पूर्ण करतांना अनेक अडचणी आल्यात मात्र केलेला संकल्प पुर्ण करण्याचा निर्धार आपण केला होता. याचेच परिणाम स्वरुप आज आपण मतदार संघातील दुस-या अभ्यासिकेच्या ईमारतीचे लोकार्पण करत असल्याचे ते यावेळी म्हणाले. आज इमारतीचे लोकार्पण झाले आहे. येथे पुस्तक व ईतर साहित्य खरेदीसाठी आपण आणखी निधी देणार असल्याचेही ते यावेळी बोलताना ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन संचालन रमा देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### किशोर जोरगेवार हे समाज उपयोगी सुचनांची तात्काळ दखल घेणारे आमदार – पप्पू देशमूख

“ आमदार किशोर जोरगेवार हे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात. त्यांना एखादी मागणी केली व ती लोकउपयोगी असली कि ते ती पूर्ण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात. आज येथे लोकार्पित झालेली अभ्यासिका याचाच प्रत्यय देणारी आहे. आपण त्यांना खुल्या अभ्यासिकेची मागणी केली ती ही समजून घेत त्यांनी यासाठी ५०लक्ष रुपयांच्या निधीची घोषणा केली आहे. एकंदरीतच किशोर जोरगेवार हे समाज उपयोगी सुचनांची तात्काळ दखल घेणारे कार्यक्षम आमदार असल्याचे यावेळी माजी नगरसेवक पप्पू देशमूख म्हणाले.

# आनंदवनात शैक्षणिक नंदनवन फुलावे- ॲड.दीपक चटप

## श्रद्धेय बाबा आमटे जयंतीनिमित्त शिक्षणयात्रेतून संवाद





**वरोरा । प्रतिनिधी**

आनंदवन ही वंचितांच्या आयुष्यात नंदनवन फुलविणारी बाबा आमटे यांची भूमी आहे. या भूमीतून देश-विदेशातील नामांकित विद्यापीठात विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण घेवून देशविकासात योगदान द्यावे. आनंदवनात बाबा आमटेंच्या प्रेरणेतून शैक्षणिक नंदनवन निर्माण व्हावे असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय चेव्हनिंग स्कॉलर ड.दीपक चटप यांनी केले. शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी दरम्यान उच्चशिक्षणाची शिक्षणयात्रा ड.दीपक चटप यांनी सुरू केली. वरोरा येथील मुख्यमंत्री सभागृह आनंदवन येथे कार्यक्रम पार पडला. यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी ज्ञानेश्वर चहारे , शिक्षण विस्तार अधिकारी नामदेव राऊत, महारोगी सेवा समिती विश्वस्त सुधाकर कडू, उपप्राचार्या राधा सबाणे, मुख्याध्यापिका विद्या गोखरे, अविनाश पोईनकर आदी मान्यवर उपस्थित होते. श्रद्धेय बाबा आमटे यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शिक्षण विभाग व विविध संस्थांनी एकत्रित येत हा कार्यक्रम आयोजित केला होता. शिक्षण यात्रा कार्यक्रमात आनंद निकेतन महाविद्यालय, लोकमान्य महाविद्यालय, विवेकानंद विद्यालय, भारत भूषण विद्यालय, आनंद माध्यमिक विद्यालय, कर्मवीर विद्यालय, जेबी सायन्स कॉलेज, आनंदवन मूकबधिर अंध विद्यालय आदी शैक्षणिक संस्थांतून ६५० विद्यार्थी सहभागी झाले होते. श्रद्धेय बाबा आमटे यांची जयंती,आनंदवनाची ७५ वर्ष आणि हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पाला ५० वर्ष आदींच्या दृष्टीने कार्यक्रमदिन ऐतिहासिक ठरला.नामांकित विद्यापीठांची प्रवेशप्रक्रिया, शिष्यवृत्ती, फेलोशीपबाबतच्या संधीचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना मिळाले. गटशिक्षण अधिकारी चहारे यांनी उच्चशिक्षातूनच आदर्श समाजनिर्मीती होईल असा आशावाद व्यक्त केला. बाबा आमटे यांनी हे पेशाने वकिल होते. मात्र कोर्टात वकिली न करता वंचितांचे आयुष्य फुलविण्यासाठी आनंदवन उभारले आणि दीन-दुबळ्यांच्या उत्थानाचे भरीव काम केले. हा सामाजिक जाणिवेचा विचार जोपासत नव्या पिढीत दीपक चटप यांचे सुरु असलेले कार्य दिशादर्शक वाटते असे विश्वस्त सुधाकर कडू म्हणाले. अविनाश पोईनकर यांनी शिक्षणयात्रेची भुमीका मांडली. यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर आनंदवन मूकबधिर अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांशी चेव्हनिंग स्कॉलर दीपक चटप यांनी विशेष संवाद साधला. क्षमतावान, प्रतिभावान व सक्षम विद्यार्थी आनंदवनात असल्याचे प्रतिपादित केले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन देखिल केले.

**देश-विदेशातील या नामांकित विद्यापीठांची दिली माहिती**

लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स, सोएस, युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन, क्विन मेरी युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ लीड्स, ऑक्सफर्ड, केंब्रिज आदी विदेशातीतील नामांकित विद्यापीठे तसेच अझीम प्रेमजी विद्यापीठ, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, राष्ट्रीय विधी महाविद्यालय, निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क, इंडीयन स्कुल ऑफ पब्लिक पॉलीसी, इंडियन स्कूल ऑफ डेव्हलपमेंट मॅनेजमेंट, आयआयटी, आयआयएम, शिवनादर आदी देशभरातील नामांकित विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, नामांकित फेलोशीप याबद्दल माहिती देण्यात आली. पुढील काळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या देश-विदेशातील नामांकित विद्यापीठात प्रवेशासाठी सहकार्य करणार असल्याचे ॲड.दीपक चटप यांनी सांगितले.

# शामसुमन बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्थे तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या वाघोली (बिरे)येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुदेव सेवा मंडळाच्या आयोजित कार्यक्रमात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कौतुक व्हावे या दृष्टीकोनातून शामसुमन बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्थे तर्फे ह.भ.प.माधव महाराज यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या संचालक रुपाली बिरे, प्रास्ताविक प्रा.जगदिशसिंग सोनाग्रे, यांनी केले,यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत बिरे, संचालक प्रविण बिरे, संदिप पांडे,तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते व गावकरी मंडळ उपस्थित होते.

# शंकरपूर येथे विज्ञान मेळावा साजरा



**चिमूर । प्रतिनिधी**

राजीव गांधी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शंकरपूर येथे विज्ञान पंधरवाडा निमित्त विज्ञान मेळावा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी हजारे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भांडारकर होत्या. कार्यक्रमाचे निमित्ताने विज्ञानावर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी विज्ञानाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विज्ञानानी काय काय शोधून काढले. हे समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे विज्ञानाचे मॉडेल बनवून आनले. त्याची प्रदर्शनी भरविण्यात आली. या कार्यक्रमा अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुळकर यांनी केले. तर आभारप्रदर्शन माळवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय शालेय क्रिडा स्पर्धांसाठी दीड हजार खेळाडू दाखल






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर-बल्लारपूर येथे होणाऱ्या६७व्या राष्ट्रीय शालेय क्रिडा स्पर्धांमधे३४राज्यांतून१५५१खेळाडूंची नोंदणी झाली असून त्यापैकी७८४मुले व६९७मुली असे एकूण१४८१खेळाडू विद्यार्थी आतापर्यंत चंद्रपुरात दाखल झाले आहेत. या सर्व खेळाडूंची अतिशय चोख व्यवस्था राखण्यात आली असून स्वतः पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार या सर्व व्यवस्थांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

चंद्रपुरातील बल्लारपूर येथे२७ते३१डिसेंबर या कालावधीत६७व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धा होत आहेत. सहभागी खेळाडूंना कसलाही त्रास होऊ नये आणि या स्पर्धांचा पूर्ण आनंद त्यांना घेता यावा,म्हणून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली व्यपस्थापन सांभाळणाऱ्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांचे अनेक गट गेले कित्येक आठवडे मेहनत घेत आहेत. राज्याचे सांस्कृतिक कार्य,वने व मत्स्यव्यवसाय मंत्री आणि चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे विविध बैठकांद्वारे या राष्ट्रीय शालेय क्रिडास्पर्धासंदर्भातील प्रशासनाच्या विविध कामांत सुसुत्रता,वेग व अचुकता राखत आहेत.या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धांमधे विविध क्रिडा प्रकारातील २५ राष्ट्रीय विजेते सहभागी होणार आहेत. सहभागी विद्यार्थी खेळाडूंचे चमू आणि त्यांचे कोच यांची राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था बल्लारपूर येथे क्रिडा संकुल परिसरात करण्यात आली आहे. तर या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांना भेट देणाऱ्या प्रमुख व्यक्तिमत्वे,राष्ट्रीय खेळाडू,विविध राज्यांतील अधिकारी यांच्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आल्या आहेत.सुप्रसिद्ध गायक संगीतकार कैलाश खेर यांनी या क्रिडास्पर्धांचे थीम साँग तयार केले असून ते समाज माध्यमांवर लोकप्रिय होत आहे.२८डिसेंबर रोजी मुलीं व मुलांच्या गटात प्रथम फेरीसाठी१५००मीटर, ४००मीटर व१००मीटर धावण्याची स्पर्धा, १००मीटर अडथळ्याची शर्यत व४द१००रिले शर्यत तरअ-गटाच्या व ब- गटाच्या पात्रता फेरीसाठी थाळी फेक,उंच उडी,गोळा फेक,,तिहेरी उडी,या स्पर्धा होणार आहे. तसेच१००मीटर व४००मीटर उपांत्य फेरीचीही लढत होणार असून हतोडा फेक साठी अंतिम लढत रंगणार आहे.२९डिसेंबर रोजी प्रथम फेरीसाठी८००मीटर, २००मीटर व४००मीटर अडथळ्याची शर्यत,गट-अ व गट-ब च्या पात्रता फेरीसाठी भाला फेक,थाळी फेक,लांब उडी तरअंतिम फेरीच्या स्पर्धांमध्ये५०००मीटर चालने (मुले), ३०००मीटर चालने (मुली), १५००मीटर, ४००मीटर व१००मीटर धावण्याची स्पर्धा, ४द१००रिले शर्यत,थाळी फेक,बांबू उडी,लांब उडी या स्पर्धा होणार आहेत.२९डिसेंबर रोजी २००मीटर उपांत्य फेरी तसेचअंतिम फेरीसाठी क्रॉस क्रंट्री, ४००मीटर अडथळ्याची शर्यत,उंच उडी,थाळी फेक,हतोडी फेक, ४द१००व४द१००रिले शर्यत,भाला फेक,लांब उडी, २००मीटर, ४००मीटर, ८००मीटर व३०००मीटर धावण्याची स्पर्धा होणार आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .